माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००२८०३**

**अपिलार्थी श्री. राजेश गणपत सुसविरकर**

**विरुद्ध**

**१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
सक्षम प्राधिकारी-१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एचडीआयएल टॉवर्स, ३ रा मजला,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

**२. जन माहिती अधिकारी**
सहा. आयुक्त, जी/साउथ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, १ ला मजला,
एन.एम. जोशी मार्ग, धनमिल नाका, प्रभादेवी, मुंबई-१३

**प्रथम अपिलीय अधिकारी**
सक्षम प्राधिकारी-१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एचडीआयएल टॉवर्स, ३ रा मजला,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०९.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०७.२०२५ | ०५.०९.२०२५ | २३.०९.२०२५ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ११.११.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती देण्यात आलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०५.०९.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २४.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"जिजामाता वरळी, मुंबई- ४०००१८, दि. १८.११.२०१८ ते ०१.०१.२०२२ तसेच दि. ०२.०४.२०२४ घराचे बायोमेट्रीक पंचनामा इत्यादी बाबत माहितीची मागणी केलेली होती."*

३. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सक्षम प्राधिकारी- १, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी त्यांचे पत्र दि. ०५.०९.२०२५ रोजी अपिलार्थींचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी, सहा. आयुक्त, जी/साऊथ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याशी संबंधीत असल्याने संबंधीत कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविले.

..२/-

अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी तहसिलदार, सक्षम प्राधिकारी- १, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे दि. २३.०९.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सक्षम प्राधिकारी- १, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी बायोमॅट्रीक पंचनाम्याची प्रतची माहिती विचारली होती. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी, सहा. आयुक्त, जी/साऊथ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे पाठविला. जेव्हा त्यांनी जन माहिती अधिकारी, सहा. आयुक्त, जी/साऊथ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याशी संपर्क केला तेव्हा त्यांना कळविले की, त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही. परंतु त्याबाबत अपिलार्थी कोणतेही अभिलेख आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

५. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सक्षम प्राधिकारी- १, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी आयोगास सादर केले की, ज्या जमिनीवर झोपड्या होत्या ती जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे व त्यांच्या अभिलेखाप्रमाणे परिशिष्ट- २ बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेले आहे. बायोमॅट्रीक परिशिष्ट- २ नुसार असते व ज्या कार्यालयाव्दारे परिशिष्ट- २ तयार केले जाते त्यांच्याकडे बायोमॅट्रीकची प्रत उपलब्ध असते. म्हणून त्यांनी अपिलार्थीचा माहिती अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग केला.

६. जन माहिती अधिकारी यांनी असेही सादर केले की, प्रथम अपील प्राप्त झाल्यावर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी, सहा. आयुक्त, जी/साऊथ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आल्याने प्रथम अपील सुध्दा त्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले आहे.

७. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

प्रदीप 7-9-2026

**मुंबई**
**दिनांक : ०७.०९.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**